## बोदवड महाविदयालयात सायबर क्राईम वर उदबोधन

## फोन कॉल्स, फेसबूकवर अनोळखी व्यक्तीसोबत मैत्री यांना बळी पडू नका

**- सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. एस. ए. बागुल**






बोदवड : कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे बोदवड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. एस. ए. बागुल यांचे विदयार्थी विकास कक्षाअंतर्गत " सायबर क्राईम" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सायबर क्राईम म्हणजे काय व त्या अंतर्गत येणाऱ्या गुन्ह्यांचा तपशील, कायदा व शिक्षा या विषयी त्यांनी अतिशय उत्कृष्ट पद्धतीने उदाहरणासहित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना त्यांनी अतिशय सोप्या पद्धतीने बिंगो लाइव्ह, इकोनोमिक ऑफेन्स, चाईल्ड पोर्नोग्राफी, आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध करणे, फेसबुक वर मैत्री करून फसवणूक करणे, मोबाईल व Whatsapp चा वापर करून अफवा पसरविणे, कॉपी राईटचे उल्लंघन करणे अश्या विषयांवर सविस्तर माहिती दिली त्याच प्रमाणे एटीएम कार्डचा वापर, ऑनलाईन शॉपिंगचा वापर करतांना कोणकोणती काळजी घ्यावी याबद्दल सांगितले तसेच फसव्या जाहिराती, फसवे फोन कॉल्स, फेसबूकवर अनोळखी व्यक्तीसोबत मैत्री यांना बळी पडू नये असे निक्षून सांगितले अशाप्रकारची घटना जर कुणासोबत घडत आहे असे निदर्शनास आले तर त्वरीत पोलिसांशी जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या Whatsapp हेल्पलाईन क्रमांक ९४२२२१०७०२ वर संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी त्यांच्या हस्ते शैक्षणिक वर्ष २०१८-१९ विदयार्थी विकास पहिल्या उपक्रमाचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अरविंद चौधरी यांनी भूषविले. आपले मनोगत व्यक्त करतांना त्यांनी आजच्या इन्टरनेटच्या जगात सोशल मिडीयाचा सारासार विचार करूनच वापर करण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी श्री. नरेंद्र जोशी यांनी केले. सूत्र संचालन प्रा. डॉ. शरद काठोके यांनी केले व डॉ. गीता पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. डी. एस. पाटील तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.